मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १३१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



# दर्पण दिन (दि ६ जानेवारी)

## सन्मान पत्रकारितेचा सत्कार पत्रकारांचा

**ज्येष्ठ पत्रकारांचा सहपरिवार सत्कार**

**उदयोन्मुख संपादक, जाहीरात प्रतिनिधी यांचा सत्कार**

**सर्व पत्रकार, छायाचित्रकार, पेपर वाटणारी मुले यांचा सत्कार**

**दै. त्रिकाल संघर्षचे लोकार्पण**

**स्थळ : भारती लॉन्स, राजुर रोड, जालना**

**मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६, वेळ सकाळी १० वा.**

**हेच निमंत्रण समजून आग्रहाची विनंती...सर्वांच्या प्रतिक्षेत...**

आयोजक

दीपक शेळके, बाबासाहेब आटोळे, दर्पण सकलेचा, गणेश काबरा,
शेख चांद पी.जे., आमेर खान, सुहास वैद्य, प्रा. दत्ता देशमुख,
शेख अशफाक, बाबुजी तिवारी, शेख चांद पी.जे., बाबासाहेब कोलते,
विष्णु कदम, सुनील भारती, शाहरुख शेख, आशिष तिवारी, प्रदीप देशमुख,
जीवन काळे, माणिक जैस्वाल, योगेश देशमुख, दिनेश नंद,
नरेंद्र जोगड, योगेश काकफळे, सुनील नरवडे, शेख मुजीबुद्दीन,
सलमान सय्यद, निकीता काळे, शेख महेजबीन.

मार्गदर्शक - अंकुशराव देशमुख, विजयकुमार सकलेचा, विनायक दहातोंडे, रवींद्र बांगड,
महेश जोशी, लक्ष्मण राऊत, गुलाब पाटील, संजय भरतीया, बद्रीनाथ टेकाळे, भरत मानकर

**पदाधिकारी, सदस्य व सभासद**

**प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र, जालना**

## संपादकीय पान

### आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले हे वृत्तपत्र पाक्षिक स्वरूपात होते. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले पाक्षिक सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे पाक्षिक सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणापासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पाक्षिक सुरू केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक पाक्षिक होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या पक्षिकाच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# 'मराठी पत्रकारितेचे जनक' दर्पणकार व समाजसुधारक आचार्य बाळशास्त्री जांभेकर

आज समस्त पत्रकारिता वर्गांसाठी महत्वाचा असा दिवस आहे कारण महाराष्ट्रात मराठी पत्रकार दिन साजरा केला जातो.वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे मराठीतील सर्वात पहिले वृत्तपत्र आजच्या दिवशी सुरू केले होते. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म २० फेब्रुवारी १८१२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोंभुर्ले येथे झाला आहे.कोकणातील राजापूर तालुक्यातील जन्मलेल्या बाळशास्त्रींनी अनेक विषयांचे अभ्यासक-संशोधकपर काम केलं.वडील गंगाधर शास्त्री यांच्या मार्गदर्शनातच त्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केलं. पुढे मुंबईत येऊन त्यांनी सदाशिव काशीनाथ ऊर्फ 'बापू छत्रे' यांच्याकडे इंग्रजी आणि बापूशास्त्री शुक्ल यांच्याकडे संस्कृतचे धडे घेतले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ दिवशी दर्पण हे वृत्तपत्र सुरू केले होते.आचार्य बाळशास्त्रीं जांभेकर यांनी दर्पण सुरू केले त्याचे स्मरण म्हणून ६ जानेवारीला पत्रकार दिन साजरा केला जातो.

आचार्य बाळशास्त्री जांभेकरयांच्या कार्य,विचारांचीगरज - आचार्य बाळशास्त्री जांभेकर व्यासंगी,अभ्यासू बहुआयामी, बहुभाषिक आणि उत्तुंग कर्तृत्व असलेले व्यक्तिमत्व होते,त्यांनी महाराष्ट्राला पहिले वृत्तपत्र देऊन वैचारिक अभिसरणाची पेरणी केली.वृत्तपत्र हे वैचारिक क्रांतीचे महत्त्वाचे साधन बनले. 'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्राच्या माध्यमातून देशात मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर मराठी भाषेतील आद्य पत्रकार होते मराठी भाषा आणि साहित्याच्या विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल होते. मराठी भाषेचा विकासासाठी प्रयत्न केले व मराठीत लेख प्रकाशित करून, त्यांनी भाषेला समृद्ध केले आणि इतरांनाही मराठीत लिहिण्यास व आपले विचार व्यक्त करण्यास प्रोत्साहित केले. शिक्षण आणि वैज्ञानिक विचारांना प्रोत्साहन दिले जांभेकर यांनी आपल्या लेखनाचा उपयोग मराठी भाषिक लोकांमध्ये शिक्षण, साक्षरता आणि वैज्ञानिक ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी केला.सामाजिक जागृतीला प्रोत्साहन देऊनआपल्या वृत्तपत्राद्वारे त्यांनी जातीय भेदभाव, बालविवाह आणि विधवा पुनर्विवाह यांसारख्या सामाजिक समस्यांवर आवाज उठवला.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे योगदान पाहता त्यांच्या कार्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

*आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचे महत्व*- आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेमुळे समाजात जागृती पसरली आणि सुधारणांना प्रोत्साहन मिळाले.जनमतासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले, त्यांचे वृत्तपत्र हे लोकांना चालू घडामोडींबद्दल वाचण्यासाठी, आपली मते मांडण्यासाठी आणि सामाजिक चर्चांमध्ये सहभागी होण्यासाठी एक माध्यम बनले.बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी पत्रकारिता सुरू करण्यात आणि तिचा उपयोग सामाजिक सुधारणा व शिक्षणाचे साधन म्हणून करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दर्पण हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू करून आधुनिक भारतीय पत्रकारितेचा पाया रचला ,ज्याचा वापर सामाजिक सुधारणा, शिक्षण आणि वैज्ञानिक विचारांना चालना देण्यासाठी केला जात असे.ते एक विद्वान, सुधारक आणि शिक्षक होते ज्यांनी बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली आणि दिग्दर्शन हे मराठी मासिक प्रकाशित केले, ते एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिले भारतीय व्याख्याते बनले आणि महिलांच्या हक्कांसाठी आणि जातीयतेच्या समाप्तीसाठी वकिली केली. तर्कशुद्ध विचारांनाप्रोत्साहन देणे,विधवा पुनर्विवाहाचे समर्थन करणे, बालविवाहाविरुद्धलढा देणे आणि समाजाच्या उन्नतीसाठी सर्वांसाठी शिक्षणाचाआग्रह धरणे,ज्ञान आणि चेतना पसरविण्यासाठी त्यांच्या दर्पण वृत्तपत्राचा वापर केला.दर्पण आणि दिग्दर्शन स्थापन केल्याबद्दल मराठी पत्रकारितेचे जनक त्यांना ही पदवी मिळाली.दिग्दर्शन हे वृत्तपत्र इतिहास, विज्ञान आणि इतर विषयांवर प्रकाश टाकणारे पहिले मराठी मासिक.जातिविरोधी चळवळी, महिला सक्षमीकरण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना समाजसुधारक म्हणून चालना दिली.एल्फिन्स्टन कॉलेजमधील पहिले भारतीय व्याख्याते, एशियाटिक सोसायटी जर्नलमध्ये प्रकाशित केले.बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे पत्रकारितेतील योगदान लक्षात घेता त्यांनी मराठी पत्रकारितेला राजमान्यता मिळवून दिली.

विवेचन-वृत्तपत्र क्षेत्रात प्रवेश व वेधशाळा, शैक्षणिक कार्य -१.बाळशास्त्रींना मराठी,संस्कृत,बंगाली,गुजराती,कानडी,तेलुगू,पारसी,फ्रेंच,लॅटिन आणि ग्रीक या दहा भाषांचे ज्ञान होते.२.भाषांसोबतच विज्ञान, गणित, भूगोल, शरीरशास्त्र आणि सामान्य ज्ञान या विषयांचीही चांगली जाण होती व त्या भाषा त्यांना चांगल्या अवगत होत्या. ३.शिवाय ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, बंगाली आणि गुजराती या भाषांवरही त्यांचे प्रभुत्व होते.भूगोल, विज्ञान,गणित अशा विषयात ते पारंगत होते.४.रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले ते पहिले भारतीय आहेत.बाळशास्त्रीं जांभेकर कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले.५.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठीतील पहिले नियतकालिक सुरू करून मराठी पत्रकारिता क्षेत्रात पाया घातला.वृतपत्रसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा दिवस उजाडला आणि आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारीला दर्पण हे वृत्तपत्र सुरू केले,या दिनाचे ऐतिहासिक स्मरण म्हणून महाराष्ट्रात आपण ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.६.इंग्रजी आणि मराठी अशा जोड भाषेत प्रकाशित होणारे हे वृत्तपत्र! या अंकात दोन स्तंभ असत. उभ्या मजकुरात एक स्तंभ मराठीत आणि एक स्तंभ इंग्रजीत असे.मराठी मजकूर अर्थातच सर्वसामान्य जनतेसाठी होता आणि इंग्रजी मजकूर वृत्तपत्रात काय लिहिले आहे. हे राज्यकर्त्यांनाही कळावे यासाठी इंग्रजी मजकूर होता.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर महत्वपूर्ण कार्य -१९ व्या शतकाच्या सुरूवातीला जेव्हा भारतामध्ये ब्रिटीश राजवटीची सुरूवात झाली होती तेव्हा त्या काळात आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे विद्याविभुषित, पंडीत व्यक्तिमत्त्व काम करत होते.१.'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या विद्यालयात अभ्यास करून त्यांनी विशीच्या आत कोणाही भारतीयाला तोवर न मिळालेली प्राध्यापक म्हणून नियुक्ती मिळवण्याइतपत ज्ञान कमवले.२.इ.स.१८३४ साली एल्फिन्स्टन कॉलेजात पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकरांची नियुक्ती झाली.३.जेम्स ऑगस्टस हिकीच्या इंग्रजी 'बेंगॉल गॅझेट' या साप्ताहिकानंतर बाळशास्त्रींनी ५० वर्षांनी दर्पण हे पहिलं मराठी वृत्तपत्र सुरू केलं.४.दर्पण ६ जानेवारी१८३२ ला प्रसिद्ध झाला आणि अवघ्या २० वर्षांच्या पण पंडीत असणार्या बाळशास्त्री जांभेकरांनी यशस्वीरीत्या संपादकपदाची धुरा सांभाळली.५.महाराष्ट्रात सुरू असलेल्या सर्वच वर्गातील वृत्तपत्र आणि मासिकांना,नियतकालिकांना बाळशास्त्रीं जांभेकर यांनी आदर्श अशी एक वाट दाखवली.६.बाळशास्त्रींनी साधारणपणे इ.स. १८३० ते १८४६ या काळात आपले योगदान महाराष्ट्राला व भारताला दिले.७.आधुनिक विचार मांडताना त्यांनी परंपरेकडे कधीही दुर्लक्ष केलं नाही.८.ज्ञानेश्वचरीसारख्या मौलिक काव्यग्रंथाचं सर्वपाठभेदासहीत संशोधन करून १८४५ मधे ग्रंथरुपाने प्रकाशित करण्याचं ऐतिहासिक कार्य त्यांनी केलं.

सामाजिक विषयावरील लेखन-१.आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख आणि ताम्रपट यांच्यावर शोधनिबंध लिहिले तसेच मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली.२.दर्पण अंक जवळजवळ साडेआठ वर्ष चालला,नंतर जुलै १९४० ला त्याचा शेवटचा अंक प्रसिद्ध झाला होता,पण त्यांनी बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन करून लोक्जागृतीत हातभार लावला.३.समाजातील वर्ण व्यवस्था, जातीभेद, स्त्री दास्य, सती, अस्पृश्यता, बालविवाह,सामाजिक प्रश्न,देशासमोरील समस्या मांडून परिवर्तनाचे मोठे कार्य त्यांनी हाती घेतेलेले होते,त्यांच्या लिखाणामुळे प्रश्न सुटण्यास फार मदत झाली.४.दर्पणच्या माध्यमातून लिखाण केल्याने त्यांना आद्य समाजसुधारकही म्हटलं जाऊ लागले. ५.महाराष्ट्राचे पहिले मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्याकडे पाहतो. पत्रकारितेबरोबरच अनेक क्षेत्रात पहिली योगदान देणारे म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल,६.बाळशास्त्री जांभेकर हे आद्य आधुनिक ज्योतिषशास्त्र विशारद,तसंच आद्य बाल व्याकरणकार, आद्य भूगोलकारही ठरलेले आहेत.७. एकोणिसाव्या शतकातले मराठीचे आद्य प्रवर्तक असं ज्यांना म्हणता येईल,८.आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना पत्रकारितेबरोबरच अनेक सामाजिक सुधारणांचे जनक असंच म्हणावं लागेल.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे विचार व प्रमुख विषय आणि कल्पना-१.ज्ञान जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे. हे व्यापक शिक्षण आणि समजुतीची त्यांची इच्छा प्रतिबिंबित करते.२.समाजात नवीन जीवनमूल्ये निर्माण करण्यासाठी आपण पाश्चात्य ज्ञान आणि शिक्षणाचा अवलंब करूया. त्यांच्या या विचारातून आधुनिक शिक्षणाच्या समाकलनाबद्दलचा त्यांचा संतुलित दृष्टिकोन दर्शवितो.३.दर्पणच्यामाध्यमातून,आम्ही सामान्य लोकांमध्ये उपयुक्त आणि निरोगी जाणीव निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. ज्ञानाचे साधन म्हणून त्यांच्या वृत्तपत्राचे त्यांचे ध्येय.४.प्रगतीसाठी सामाजिक समस्यांकडे तर्कसंगत दृष्टिकोन आवश्यक आहे. अंधश्रद्धेपेक्षा वैज्ञानिक विचारसरणीवर त्यांचा भर.५.जनतेला जागृत करण्यासाठी आणि स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रिंट मीडियाची शक्ती अत्यंत महत्त्वाची आहे.६.सुधारणेचे साधन म्हणून पत्रकारिता: सामाजिक दुर्गुणांचे प्रतिबिंब पाडण्यासाठी आणि प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी दर्पण (द मिरर) चा वापर.७.शिक्षणाद्वारे आधुनिकीकरण: वैज्ञानिक ज्ञान आणि टीकात्मक विचारसरणी ही सामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे यावर विश्वास ठेवणे.८.सामाजिक न्याय: समतापूर्ण समाज निर्माण करण्यासाठी सती प्रथा, बालविवाह आणि जातीय भेदभाव यासारख्या प्रथांना सक्रियपणे विरोध करणे.९.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे मत-असे म्हणाले होते की,'असे एक वर्तमानपत्र पाहिजे ज्यात मुख्यत्त्वे करून एतद्देशीय लोकांचा स्वार्थ होईल. ज्यायोगे त्यांची मनोगते कळतील, इच्छा कळतील. जवळच्या प्रदेशात आणि परकीय मुलुखात जी वर्तमाने होतात ती समजतील.जे विचार विद्येपासून उत्पन्न होतात आणि ज्या लोकांची नीती बुद्धी आणि राजरिती यांच्या सुरुपतेस कारण होते ते विचार करण्यास उद्योगी आणि जिज्ञासू मनास मदत होईल.स्वदेशी लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धी आणि येथील लोकांचे कल्याण या विषयी स्वतंत्रतेने आणि उघड रितीने विचार करण्यास साधन मिळावे, या दृष्टीने मनात आहे की दर्पण नावाचे नियतकालिक काढावे,मग त्यांनी सुरु केले.

समाजसुधारक आचार्य बाळशास्त्री जांभेकर-आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. 'दर्पण' हे बाळशास्त्रींच्या हातातील एक लोकशिक्षणाचे माध्यम होते,त्याचा उत्तम वापर त्यांनी समाज प्रबोधनासाठी करून घेतला,यात विशेष उल्लेख त्यांनी हाताळलेल्या विधवांच्या पुनर्विवाहाच्या प्रश्नाचा व वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसाराचा करावा लागेल.बाळशास्त्रीं जांभेकरानी या विषयांवर विपुल लिखाण केले व जनजागृती केली.मराठी पत्रकार परिषदेनं या सर्व गोष्टींचा विचार करून मुकुंद बहुलेकर या चित्रकाराकडून हे छायाचित्र बनवून घेतले.१९९९ मध्ये या चित्राचे अनावरण पुण्यातील बालगंधर्व मध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बोलताना बाळासाहेब ठाकरे यांनी हेच खरे बाळशास्त्री जांभेकर असे सांगत चित्रकार बहुलेकर यांचा सत्कारही केला होता.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कामाची पद्धत, त्यांच्या विचारांचा ठेवा आणि समाजात प्रबोधन घडवून आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. आजच्या या मराठी पत्रकार दिनानिमित्त आपण बाळशास्त्री जांभेकर यांच्याबद्दलच्या काही खास गोष्टी जाणून घेणार आहोत.१८४० मध्ये जांभेकरांनीच 'दिग्दर्शन' या मराठीतील पहिल्या मासिकाची सुरूवात केली होती. या मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी जवळपास ५ वर्षे काम पाहिले होते.महाराष्ट्र आणि भारताला जागृत करण्यासाठी त्यांनी दिलेल्या समर्पणाबद्दल त्यांना आठवले जाते, ज्यामुळे त्यांना मराठी पत्रकारितेचे जनकम्हटले जाते.राष्ट्र उभारणीत पत्रकारितेच्या भूमिकेबद्दल यांची दूरदृष्टी होती,पत्रकारितेतील मानबिंदू असलेले आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे अल्पावधीच्या आजारानंतर मुंबईत १७ मे १८४६ रोजी निधन झाले.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर आपली पुरातन परंपरा आणि नवं ज्ञान यांचा समन्वय या मातृभूमीचं पांग फेडण्यासाठी,देशाच्या विकासासाठी कसा करता येईलयाचा ते सातत्याने करीत असत. पत्रकारितेतून समाज परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या,इंग्रजी शिक्षणाचं वाघिणीचं दूध पुरतं पचवलेला हे विचारवंत बाळशास्त्री जांभेकर होते,त्यांच्या कार्याचा आदर्श,प्रेरणा घेऊन हजारो पत्रकार त्यांनी दिलेल्या वाटेने समाजपरिवर्तनाचे कार्य अहोरात्र करीत आहे.

**प्राचार्य डॉ. सतीश उत्तमराव पाटील,**
**मनकर्णाबाई विनायकराव मराठे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,पिंपळनेर, ता.साक्री,जि.धुळे.**

# न्यायाच्या मार्गात तांत्रिक अडचणी अडथळा ठरू नयेत

### ॲड. महेश एस. धन्नावत, कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन

**जालना -** निवडणूक अर्ज भरताना उमेदवाराने प्रामाणिकपणे अतिरिक्त माहिती जाहीर केली, जरी त्यासाठी अर्जाच्या नमुन्यात बदल करावा लागला तरी, केवळ या तांत्रिक कारणावरून निवडणूक रद्द करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. पालघर विधानसभा मतदारसंघातील आमदार राजेंद्र गावित यांच्या निवडणुकीला आव्हान देणारी याचिका फेटाळताना न्यायालयाने हा निर्णय दिला.

या निकालामुळे आगामी जालना महानगरपालिका निवडणुकीसह इतर निवडणुकांमधील उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धन्नावत यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, हा निकाल लोकशाहीतील पारदर्शकतेला प्रोत्साहन देणारा असल्याचे म्हटले आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

पालघर मतदारसंघातील आमदार राजेंद्र गावित यांनी त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात (फॉर्म २६) 'पत्नी २' असा अतिरिक्त रकाना जोडून आपल्या दुसऱ्या पत्नीची माहिती जाहीर केली होती.

याचिकाकर्ते सुधीर जैन यांनी यावर आक्षेप घेत, फॉर्म २६ च्या मूळ नमुन्यात बदल करणे हे नियमांचे उल्लंघन आहे आणि दुसरी पत्नी जाहीर करणे ही मतदारांवर 'अवाजवी प्रभाव' टाकणारी 'भ्रष्ट आचरण' आहे, असा दावा केला होता.

त्यांनी लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ (च्या कलम १०० आणि १२३ अंतर्गत ही निवडणूक रद्द करण्याची मागणी केली होती.

**न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा**

न्यायमूर्ती संदीप व्ही. मारणे यांनी याचिकाकर्त्याचे सर्व मुद्दे खोडून काढत याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने खालील महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली:

प्रामाणिकपणा महत्त्वाचा: उमेदवाराने कोणतीही माहिती न लपवता प्रामाणिकपणे जाहीर करणे हे मतदारांच्या माहितीच्या अधिकारासाठी आवश्यक आहे. माहिती लपवण्याऐवजी ती अतिरिक्त रकाना तयार करून जाहीर करणे हे दोषपूर्ण ठरत नाही.

तांत्रिक बाबी गौण: केवळ अर्जाच्या नमुन्यात बदल केला म्हणून उमेदवारी अर्ज स्वीकारणे अयोग्य ठरत नाही. कायद्याचा उद्देश माहिती लपवणे नसून ती लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

भ्रष्ट आचरणाचा पुरावा नाही: दुसऱ्या पत्नीची माहिती जाहीर केल्याने मतदारांवर कसा 'अवाजवी प्रभाव' पडला किंवा निकालावर त्याचा काय 'भरीव परिणाम) झाला, हे सिद्ध करण्यात याचिकाकर्ते अपयशी ठरले.

खोट्या माहितीचा अभाव: याचिकाकर्त्यांनी स्वतःच मान्य केले की ती व्यक्ती गावित यांची दुसरी पत्नी आहे. त्यामुळे गावित यांनी कोणतीही खोटी माहिती दिली नाही, हे स्पष्ट होते.

**जालना महानगरपालिका निवडणुकीसाठी मार्गदर्शक**

ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, हा निकाल आगामी जालना महानगरपालिका निवडणुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. अनेकदा उमेदवार किरकोळ तांत्रिक चुकांमुळे किंवा माहिती जाहीर करण्याच्या पद्धतीमुळे अडचणीत येतात. या निकालाने स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत उमेदवार प्रामाणिकपणे आणि सत्य माहिती देत आहे, तोपर्यंत केवळ तांत्रिक चुकांवरून त्याची उमेदवारी धोक्यात येऊ शकत नाही.

मालमत्ता, कौटुंबिक माहिती किंवा इतर कोणतीही आवश्यक माहिती असेल, तर ती स्पष्टपणे प्रतिज्ञापत्रात नमूद करावी. हा निकाल प्रामाणिक उमेदवारांसाठी एक कायदेशीर ढाल आहे आणि मतदारांना त्यांच्या उमेदवाराबद्दल संपूर्ण माहिती मिळवण्याचा हक्क देतो.थोडक्यात, या निकालाने निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि प्रामाणिकपणाला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, तांत्रिक बाबींपेक्षा न्यायाचे महत्त्व अधिक असल्याचे अधोरेखित केले आहे.

## वाचकांचे मनोगत

### दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे राष्ट्रीय स्मारक मुंबईत व्हावे

मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी शुक्रवार, दिनांक ६ जानेवारी १८३२ साली पहिले मराठी पाक्षिक सुरु केले.महिन्यातून दोन वेळा छापले जात असे.दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे जन्मगाव सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभुर्ली.६ जानेवारी हा दिवस देशभरात पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो.दर्पण पाक्षिक १ जुलै १८४० पासून बंद केले.१० जानेवारी १८३९ च्या बॉम्बे दर्पण मध्ये दिग्दर्शन मराठी मासिक सुरू करीत असल्याचे प्रसिद्ध केले होते.दिग्दर्शनचा पहिला अंक १ हे १८४० रोजी प्रसिद्ध झाला.दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते.मराठी बरोबर इंग्रजी ही वाचकांना वाचायला मिळेल तसेच मराठीचे इंग्रजी भाषांतर केले तर वाचकांना अधिक लाभ होईल असे मत होते.कोकणच्या सुपुत्राने १९४ वर्षांपूर्वी देशात क्रांती घडवून आणली.त्या काळात सुरू केलेल्या पहिल्या मराठी दर्पण अंकामुळे त्यांना दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर अशी ओळख निर्माण झाली.दर्पणकारांच्या प्रयत्नाने मराठी वृत्तपत्र सृष्टीचे नावलौकिक झाले.आज, असंख्य दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके प्रसिद्ध होत आहेत याचा मराठी माणसाला गर्व आहे.मराठी वृत्तपत्र सृष्टीत कांती घडवणाऱ्या दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे देशाच्या आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत यथोचित राष्ट्रीय स्मारक महाराष्ट्र सरकारने उभारावे अशी विनंती आहे.६ जानेवारी पत्रकार दिनानिमित्त मागणी करीत आहे.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा ७ जानेवारीपासून १ लाख ४९ हजार ८७२ विद्यार्थी प्रविष्ट

**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतील १२१ शिक्षणक्रमांच्या हिवाळी परीक्षांचे आयोजन बुधवार, दि. ७ जानेवारी ते दि. ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांच्या सत्र व वार्षिक परीक्षा तसेच मे २०२५ च्या सत्र परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची ही लेखी परीक्षा राज्यभरातील २६९ परीक्षा केंद्रांवर होणार आहे. या परीक्षेसाठी १ लाख ४९ हजार ८७२ विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची वर्ग 'क' परीक्षा रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी होणार असून तसेच महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. त्यामुळे दिनांक १४, १५ व १६ जानेवारी २०२६ रोजी नियोजित असलेल्या विद्यापीठाच्या परीक्षांचे आयोजन पुढे ढकलण्यात आले आहे. मुक्त विद्यापीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी नोकरदार, व्यावसायिक, पोलीस, सैनिक, गृहिणी, शिक्षक, कामगार अशा समाजातील विविध घटकांतील असून या परीक्षेमध्ये विविध विषय मिळून ६ लाख ७९ हजार ९५४ उत्तरपत्रिका लिहिल्या जाणार आहेत. परीक्षा सुरळीत व पारदर्शकपणे होण्यासाठी विद्यापीठामार्फत विविध भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षा आयोजनासंबंधी सर्व आवश्यक मार्गदर्शक सूचना विभागीय केंद्रांमार्फत परीक्षा केंद्रांना देण्यात आलेल्या असून विद्यार्थ्यांसाठी मदत यंत्रणाही कार्यरत करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांसाठी जानेवारी २०२६ परीक्षेची संपूर्ण व अद्ययावत माहिती विद्यापीठाच्या ूर्लौ. वळसर्ळीरर्श्रींपर्ळींशींीर्ळीं.रल या संकेतस्थळावरील एराळपरींळेप या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी आवश्यक माहितीसाठी या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# कलीच्या प्रभावापासून बचावासाठी देवाचे नामस्मरण गरजेचे - प.पु. रामदास महाराज आचार्य



**जालना । प्रतिनिधी -** कलियुगात कली म्हणजे कोण, तर जी पापकर्मे आहेत, वाईट कामे, अनैतिक बाबी अशा सगळ्या दुष्कर्मांचा कारक हाच कली आहे. अशा दुष्कर्मांना प्रोत्साहन देऊन माणसांना त्यात गुरफटून ठेवणे,असत्संगाशी संग करून, वेळप्रसंगी माणसाची मोठी हानी करणे, किंबहुना माणसाला संपविण्याचे काम हाच कली करतो. त्यामुळे कलीपासून बचावासाठी देवाचे नामस्मरण हाच सर्वोत्तम पर्याय असल्याचे प्रतिपादन येथील आनंदवाडी श्रीराम मंदिरांचे संचालक प.पु. रामदास महाराज आचार्य यांनी योगेश्वरी कॉलनीतील श्रीमद् भागवत कथा सप्ताह समाप्तीच्या दिवशी केले. दि. २८ डिसेंबर पासून सुरू असलेल्या या सप्ताहाची सांगता दि.३ जानेवारी रोजी झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राम दास महाराजांनी रामायण, महाभारतातील वेगवेगळी उदाहरणे देऊन चांगल्या आणि वाईट बाबी कशा ओळखाव्यात हे पटवून दिले. ठराविक वेळ आल्याशिवाय मनुष्य सत्संगाला आपलंसं करीत नाही,असे सांगून, चांगल्या आचारांबरोबरच चांगले विचार हेच माणसाला प्रगतीकडे नेतात, वाईटाचा पूर्णपणें त्याग करून माणसाने सत्कर्माची कास धरावी, असेही आवाहन रामदास महाराज आचार्य यांनी यावेळी केले. याप्रसंगी सप्ताहाचे आयोजक मोहिनीराज कुलकर्णी यांनी रामदास महाराज यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहाराने सत्कार केला. यावेळी कल्याण महाराज आचार्य, श्री. मुळे,रवि कुलकर्णी, डोणगावकर यांच्यासह भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# क्रांती संस्थेच्या वतीने पारधी समाजासाठी कॅम्पचे आयोजन व विविध सामाजिक सुरक्षा कार्ड चे वाटप

**परतूर । प्रतिनिधी -** क्रांती संस्था आणि टाटा पावर कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट मुंबई यांच्या वतीने परतूर येथील बिरसा मुंडा नगर येथे आज दि. ३ जाने. २०२६ रोजी आदिवासी समूहातील पारधी समाजाला विविध दस्तावेज उपलब्ध व्हावे आणि वेगवेगळ्या शासकीय योजनेचा लाभ मिळावा यासाठी समाधान मेळाव्याचे चे (डॉक्युमेंट कॅम्प चे) आयोजन करण्यात आले. पारधी समाजाला विकासाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी क्रांती संस्था आणि टाटा पावर कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट मुंबई यांच्या वतीने परतूर शहरात काम चालू आहे.



विविध शासकीय योजनेपासून समाज वंचित असून त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळावा यासाठी संस्था काम करत आहे. कॅम्पस च्या माध्यमातून काढलेल्या विविध दस्तावेजांचे (आभा कार्ड, ईश्रम कार्ड, इनकम सर्टिफिकेट, आयुष्मान भारत कार्ड , बँक पासबुक, बांधकाम मजूर कार्ड इ.) चे वाटप व्हाइस ऑफ मिडियाचे परतूर तालुकाध्यक्ष भाऊसाहेब पाटील मुके व इतर मान्यवर पत्रकारांच्या हस्ते करण्यात आले

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त सावित्रीबाईंना अभिवादन करून जातीचे प्रमाणपत्र, रेशन कार्ड, अपघाती विमा पॉलिसी उज्वला गॅस योजना इत्यादी साठी कॅम्प चे आयोजन करण्यात केले होते. मागील ५ महिन्यामध्ये हा क्रांती संस्थेचा ४ था समाधान मेळावा असून आणखी काही मेळावे आयोजित करण्यात येतील.

. याप्रसंगी पत्रकार अजय देसाई, अर्जुन पाडेवार, मुमताज अन्सारी, कैलास सोळंके पाटील, केदार शर्मा, अशोक ठोके, माणिक जैस्वाल, राज भदर्गे, सर्फराज नाईकवाडी, तारेख शेख यांच्यासह क्रांती संस्थेचे ऍड. राजेश थोरात, मंगल काळे, विजय पवार, मधुकर थोरात, दुर्गा काळे, प्रकाश सोनवणे, संतोष चव्हाण, मीना चव्हाण, धुर्पता पवार आदी नी परिश्रम घेतले.

# आज जालना येथे भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांची संवाद बैठक

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ.श्री. रवींद्र चव्हाण हे दि. ०६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.00 वा. गोकुळ लॉन्स, हॉटेल गॅलेक्सी, जालना येथे जालना महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने प्रमुख पदाधिकारी, जिल्हा कार्यकारिणी, संचलन समिती, निवडणूक संचलन समिती तसेच शक्ती केंद्र प्रमुख व बूथ प्रमुखांसी संवाद साधणार आहेत.

या संवाद बैठकीस माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे, महानगर निवडणूक प्रमुख व माजी आमदार कैलास गोरंट्याल, महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, अशोक पांगारकर, विजय कामड, विमलताई आगलावे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या बैठकीस भाजपा प्रमुख पदाधिकारी, शक्ती केंद्र प्रमुख, बूथ प्रमुख, जिल्हा कार्यकारिणी सदस्य, मंडळ अध्यक्ष, मंडळ कार्यकारिणी सदस्य,

प्रभागाचे प्रभारी, उमेदवारांनी व कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना महानगर च्या वतीने करण्यात आले आहे.




# झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड दिले आता आवाज योजनेतून घरे देऊ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन; मनपा निवडणुकीनिमित्त जालन्यात जंगी सभा




**जालना । प्रतिनिधी -** गेल्या अनेक वर्षांपासून जालना नगर पालिका इतर पक्षांच्या ताब्यात होती, मात्र त्यांनी शहराचा विकास केला नाही. आम्ही झोपडपट्टीतील नागरिकांना पीआर कार्ड दिले असून आता पंतप्रधान आवास योजनेतून हक्काची घरे बांधण्यासाठी निधी दिला जाईल. जालन्याला महाराष्ट्रातील 'टॉप' शहर बनवण्यासाठी भाजपला कौल द्या, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. जालना महानगरपालिकेच्या प्रचार सभेत ते बोलत होते.

कैलास गोरंट्याल यांच्या भाजप प्रवेशावर भाष्य

मुख्यमंत्री फडणवीस यांनी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचे कौतुक करताना विरोधकांना टोला लगावला. ते म्हणाले, गोरंट्याल यांना नगर परिषद चालवण्याचा मोठा अनुभव आहे, पण काँग्रेसमध्ये असताना त्यांना त्यांच्याच पक्षाने आणि तत्कालीन सरकारने साथ दिली नाही. आता त्यांना चिंता करण्याची गरज नाही, कारण भाजपसारखा मजबूत पक्ष आणि राज्य सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

सभेतील महत्त्वाचे मुद्दे आणि घोषणा:

सौर ऊर्जा आणि महिला सक्षमीकरण: ऊर्जा मंत्री असताना जालन्यातील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी १०० कोटी दिले होते. आता महिला बचत गटांसाठी शहरात 'उमेद मॉल' सुरू करण्यात येईल.

पाणीप्रश्न: पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याचे स्वप्न असून ते भाजपच पूर्ण करेल.

पंतप्रधान मोदींच्या योजना: स्मार्ट सिटी, अमृत योजना आणि स्वच्छ भारत मोहिमेतून जालन्यासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे.

टीका आणि प्रत्युत्तर

सभेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती टीका केली. रावसाहेब दानवे हे सरपंच ते केंद्रीय मंत्री अशा पदांवर जनतेतून निवडून आले आहेत. उद्धव ठाकरे मागच्या दाराने विधानपरिषदेत कसे गेले, हे त्यांनी जाहीर करावे, असे आव्हान त्यांनी दिले. तर रावसाहेब दानवे यांनी नवनिर्वाचित खासदार कल्याण काळे यांना लोकसभेत जिंकल्यावर तुम्ही काय कल्याण केले? असा सवाल विचारला.

स्थानिक नेत्यांची फटकेबाजी

कैलास गोरंट्याल: सध्या मंदीची लाट आहे, मंदी जाऊ द्या मग माझी किंमत सांगतो, अशा शब्दांत त्यांनी अर्जुन खोतकर यांच्यावर निशाणा साधला. तसेच मेडिकल कॉलेज आणि अमृत योजनेचे श्रेय स्वतःचेच असल्याचे सांगत जीएसटी परतावा देण्याची मागणी केली.

बबनराव लोणीकर: एमआयडीसीतील उद्योजकांना धमकावणाऱ्या गुंडांपासून केवळ देवेंद्र फडणवीस हेच वाचवू शकतात, असे मत मांडले.

भास्कर दानवे: सर्वांना संधी दिली, आता एकदा भाजपला संधी देऊन बघा, असे आवाहन जिल्हाध्यक्षांनी केले.

बातमीतील 'आटोपशीर' विश्लेषण:

प्रलंबित प्रकल्प । सभेत ड्राय पोर्ट आणि आयसीटी शाखेचा उल्लेख झाला, मात्र प्रत्यक्षात हे प्रकल्प ८ ते १२ वर्षांपासून रखडलेले असल्याचा सूर नागरिकांमध्ये आहे. ।

विसर पडलेल्या घोषणा । सीडस पार्क आणि रेशीम पार्क या जुन्या घोषणांचा मुख्यमंत्र्यांना विसर पडल्याची चर्चा सभेनंतर रंगली होती.

प्रमुख उपस्थिती आमदार नारायण कुचे, संतोष दानवे, सतीश घाटगे, राहुल लोणीकर, अक्षय गोरंट्याल व अन्य मान्यवर.






# पत्रकारिता ही समाजाचा आरसा आहे ज्यामध्ये सर्व काही प्रकट होते

आज, ६ जानेवारी, महाराष्ट्र राज्यात आपण दर्पण दिन साजरा करतो. मराठी पत्रकारितेचे प्रणेते आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांनी याच दिवशी, ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण वृत्तपत्र सुरू केले. आचार्य बाळ शास्त्री जांभेकर यांचा जन्म २० फेब्रुवारी १८१२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभुरले या गावी गंगाधर शास्त्री जांभेकर यांच्या घरी झाला. आचार्य बाळ शास्त्री जांभेकर लहानपणापासूनच बुद्धिमान आणि हुशार होते. त्यांनी तरुण वयातच मराठी, संस्कृत, फारसी, उर्दू, बंगाली, गुजराती, कन्नड, तेलगू, फ्रेंच, लॅटिन आणि ग्रीक अशा १० हून अधिक भाषांवर प्रभुत्व मिळवले होते. त्यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण वृत्तपत्राने आपला पत्रकारितेचा प्रवास सुरू केला. आचार्य बाळ शास्त्री जांभेकर हे केवळ पत्रकार नव्हते तर शिक्षणतज्ज्ञ, भाषाशास्त्रज्ञ, संशोधक, लेखक आणि इतिहासकार देखील होते. त्यांनी १८३९ मध्ये दिग्दर्शन हे मासिक देखील सुरू केले. १८२५ मध्ये ते मुंबईत आले. त्यांच्या वृत्तपत्राद्वारे त्यांनी मराठी पत्रकारितेचा पाया घातला आणि दर्पण वृत्तपत्र सुरू केले. त्याचबरोबर त्यांनी आपल्या पत्रकारितेद्वारे समाजसुधारक आणि सामाजिक कार्यकर्त्याचे कर्तव्यही बजावले. धर्माच्या नावाखाली लादलेल्या अनावश्यक रूढी आणि परंपरांना त्यांनी संपवले. आज ६ जानेवारी रोजी मराठी पत्रकारितेच्या या प्रणेत्याचे आपण स्मरण करतो कारण आज महाराष्ट्र राज्याने पत्रकारितेच्या क्षेत्रात स्वतःसाठी एक वेगळे स्थान निर्माण केले आहे आणि स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर पत्रकारितेच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात महत्त्वपूर्ण बदल आणि परिवर्तने घडली आहेत आणि आज महाराष्ट्र राज्य विकासाच्या मार्गावर आहे. महाराष्ट्र राज्याने आपल्या प्रभावी, वैविध्यपूर्ण पत्रकारितेद्वारे देशात एक प्रमुख स्थान प्राप्त केले आहे. महाराष्ट्र राज्याचे संस्कृती, समाज, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि शिक्षण यासह प्रत्येक क्षेत्रात एक अद्वितीय स्थान आहे. जरी आज, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या या युगात, पत्रकारितेतही महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत आणि पत्रकारितेवरही आज राजकारणाचा प्रभाव पडत आहे, आणि महाराष्ट्र राज्याच्या पत्रकारितेवर राजकारणाचा महत्त्वपूर्ण परिणाम आपल्याला जाणवत आहे.



प्राचीन काळापासून मानव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पत्रकारितेशी जोडलेला आहे. बातम्या आणि माहितीचे प्रसारण वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या स्रोतांद्वारे प्रचलित आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की दैवी ग्रंथ पवित्र कुराण मध्ये बातम्यांची पडताळणी, संशोधन, सत्य आणि असत्य यांच्यातील फरक ओळखणे आणि चांगुलपणाला प्रोत्साहन देणे या तत्त्वांवर देखील भर दिला आहे, जे खरं तर पत्रकारितेचे मूलभूत आधारस्तंभ आहेत. उदाहरणार्थ, सुरा अल-हुजुरात (४९:०६) मध्ये, सुरा बनी इस्रायल (१७:३६) मध्ये तपास करण्याचा आणि खोटेपणा टाळण्याचा आदेश पत्रकारितेच्या नीतिमत्तेचे समर्थन करतो आणि सुरा अन-नहल (१६:१२५) मध्ये शहाणपणाने आमंत्रित करण्याचा आदेश (जो आजच्या माध्यमांसाठी आहे) पत्रकारितेला योग्य दिशेने मार्गदर्शन करतो. पत्रकारितेला समर्थन देणारी कुराणातील तत्त्वे तपास आणि पडताळणी करण्याचा आदेश समाविष्ट करतात. सुरा अल-हुजुरात (४९:०६) मधील ही आयत म्हणते: हे श्रद्धावानांनो, जर एखादा तुमच्याकडे बातमी घेऊन आला तर त्याची चौकशी करा, नाहीतर तुम्ही अज्ञानामुळे एखाद्या समुदायाचे किंवा लोकांना नुकसान पोहोचवाल आणि नंतर तुम्ही केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप कराल. तथ्य तपासणीचे तत्व हे मूलभूत आदेश आहे. कुराणने पत्रकारितेसाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि अंतर्दृष्टी आवश्यक असल्याचे आवाहन केले आहे. तुमच्या प्रभूच्या मार्गाकडे शहाणपणा आणि चांगल्या सल्ल्यासह आमंत्रित करा आणि त्याच्याशी सर्वोत्तम मार्गाने वार्तालाप करा ही सुरा अन-नहलची आयत (१६:१२५) माध्यमे आणि पत्रकारितेद्वारे सकारात्मक संदेश देण्यावर भर देते. आजकाल, आपले पत्रकार आणि स्तंभलेखक फक्त राजकारण आणि राजकारण्यांमध्ये रस घेतात, तर आधुनिक युगात, राजकारण सामाजिक जीवनाचा दुय्यम भाग बनले आहे, परंतु आपली पत्रकारिता आणि पत्रकार राजकारणाला सर्वकाही समजू लागले आहेत. राजकारणाच्या क्षेत्रातील आपले अपयश असाधारण असल्याने, आपली पत्रकारिता या अपयशांना आणि निराशांना समाजापर्यंत पोहोचवण्याचे कर्तव्य बजावत आहे, जे कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन नाही तर एक प्रकारची आळशीपणा आहे. म्हणून, वर्तमानपत्रांचे स्तंभलेखकांना वाचा किंवा टीव्ही चॅनेलचे अँकर, स्तंभलेखक आणि वादविवाद ऐका. ते समाजाच्या कानात आणि डोळ्यात विष ओतताना तुम्हाला दिसतील. पत्रकारिता म्हणजे बातम्या, माहिती, ज्ञान हे आपल्याला चांगलेच माहित असल्याने, पत्रकारिता म्हणजे लोकांसाठी लोकांबद्दल तयार केलेली सामग्री आहे, तर पत्रकारिता देखील घाईघाईने लिहिलेले साहित्य मानले गेले आहे. शुद्ध साहित्याप्रमाणे पत्रकारितेत कल्पनाशक्ती आणि संकल्पनांना शून्य वाव असतो. पत्रकारिता ही पोकळीत जन्माला येत नाही आणि सत्य, कटुता, सुखद आणि अप्रिय घटना, राजकारण, धर्म, अपघात, अनुभव हे पत्रकारितेचे प्रेरणास्थान आहेत. पत्रकारिता ही समाजाचा आरसा आहे ज्यामध्ये सर्वकाही प्रकट होते आणि पत्रकारिता हे एका उत्कटतेचे नाव आहे जे एखाद्या व्यक्तीमध्ये जाणीवपूर्वक निर्माण करता येत नाही, तर पत्रकारितेची ही भावना पत्रकारात नैसर्गिकरित्या जन्माला येते, म्हणून पत्रकारिता ही सामाजिक आणि सांस्कृतिक जबाबदारीची भावना आणि ती पार पाडण्याची भूमिका आहे आणि पत्रकारितेची ही भावना स्वतः निर्माण केलेली आहे आणि ही भूमिका देखील स्वतः मिळवलेली आहे. त्यात, त्याच्या मूळ आणि मूलभूत प्रेरणा वगळता, कोणतेही बाह्य घटक फारसे काम करत नाहीत. म्हणून, पत्रकारितेला एक व्यवसाय म्हणून पाहणे अजिबात योग्य नाही, परंतु पत्रकारिता ही पूर्णपणे एक उत्कटता आहे जी निश्चितच देवाने दिलेली आहे आणि पत्रकारितेद्वारे देश, राष्ट्र आणि लोकांची सेवा करता येते. पत्रकाराने आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवणे आणि संयमी आणि सभ्य वृत्ती स्वीकारणे आवश्यक आहे. पत्रकारितेचे हे सर्व गुण आचार्य बाळ गंगाधर शास्त्रीं जांभेकर मध्ये एकाच वेळी आढळून आले आणि त्यांनी पत्रकारिता हे त्यांचे अधिकृत कर्तव्य म्हणून बजावले आहे, तर त्यांचे निधन अगदी लहान वयात, म्हणजे १७/०५/ १८४६ रोजी वयाच्या ३४ व्या वर्षी त्यांचे निधन झाले, परंतु या लहान वयात त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात एक मैलाचा दगड म्हणून महत्त्वपूर्ण सेवा बजावली आणि आज राज्याची पत्रकारिता आचार्य बाळ शास्त्री जांभेकर यांचे ऋणी आहे.



**लियाकत अली खान यासिर जालनवी**
**०९४२२७२४२५७**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.